**प्रेसनोट** **दि.२५/०५/२०१९**

## मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर.

## कम्युनिटी पोलीसिंग व क्रिकेट स्पर्धा

मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा समन्वय पोलीस ठाणे हद्दीतील सर्व नागरीकांसोबत असणे आवश्यक आहे व नागरीकांना आपल्या सोबत ठेवायचे असले व समन्वय साधायचा असेल तर नागरीकांना सोबत घेवून वेगवेगळे कल्याणकारी योजना, स्पर्धा, चर्चासत्र, बैठका आयोजीत करुन कम्युनिटी पोलीसिंग उपक्रम करावेत याकरीता मुंढवा पोलीस स्टेशन कडून दि. २३/०५/१९ ते २४/०५/१९ रोजी दरम्यान मुंढवा येथील लेजड क्रिकेट मैदानामध्ये नागरीक व पोलीस यांच्या वेगवेगळया क्रिकेट संघ बोलावून स्पर्धा नागरीकांच्या सहकार्यातून व कै. चंचलाताई कोद्रे यांच्या स्मृतिपित्यर्थ आयोजीत केल्या होत्या त्या स्पर्धेमध्ये एकुण १८ संघ सामील झाले होते. त्यांना प्रथम उद्देश व कम्युनिटी पोलीसिंग उपक्रमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सदर क्रिकेट स्पर्धेमध्ये एकुण १८ संघापैकी मुंढवा पोलीस स्टेशनकडील संघ सहभागी झाल्याने पोलीस दलात कर्तव्य करीत असताना उपलब्ध अल्पवेळेमधूनही पोलीसांनी चांगली कामगिरी व विशेष कार्यक्रम राबविलेबद्दल सर्व संघानी व स्थानिक नागरीकांनी कौतुक करुन अभिनंदन केले.

